Scholars World
INTERNATIONAL PEER REVIEWED REFEREED MULTIDISCIPLINARY JOURNAL OF CONTEMPORARY REASERCH
Impact Factor: 4.433
Online ISSN: 2320-3145, Print ISSN: 2319-5789

मराठी साहित्य आणि भूगोल, मानवी जीवनाचा शाश्वत विकास

प्रा.अहिरे उज्वला उत्तम

मराठी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे
महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय स्वायत्त मालेगाव कॅम्प मालेगाव

प्रमुख शब्द- बीज शब्द
भाषा , मराठी साहित्य, भूगोल, मानवी जीवन, शेतकरी , शेती , उच्च शिक्षण शाश्वत विकास.
संदर्भ: पाठ्यपुस्तके, कविता , कथा

प्रस्तावना:
मानवी जीवनाचा शाश्वत विकास हा विशेष करून अन्न वस्त्र , निवारा यांमुळे होतो.परंतु सगळ्यात महत्त्वाची म्हणजे मानवी जीवनात शिक्षण हे महत्त्वाचे आहे. उच्च शिक्षणातील मराठी साहित्य, भूगोल यांची भूमिका खूप महत्त्वाची ठरते. देशाचा मानवाचा शाश्वत विकास व्हावयाचा असेल तर शेतकरी जीवन , शेती यांचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे.मराठी साहित्य, भूगोल,मानव, समाज, संस्कृती,शेती, शेतकरी मानव व देशाचा विकास यांचे अतुट नाते आहे

भूगोल, शेतकरी , मजूर तसे संपूर्ण मानवी जीवन यांचे चित्रण मराठी साहित्यात उमटते.

हिरीताचं देनं घेनं - कवयित्री बहिणाबाई चौधरी

नको लागू जीवा,सदा मतलबापाठी
हिरीताचं देनं घेनं नाही पोटासाठी

उभे शेतामधी पिकं
ऊन वारा खात खात
तरसती ' 'कव्हा जाऊ देवा ,
भूकेल्या पोटात '

या ओळीत कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी तत्वज्ञान सांगितले आहे.त्या म्हणतात की,हिरीत म्हणजे हृदय,अगदी प्रामाणिकपणे, मनाने , आनंदाने केलेलं दिलें काहीही दुसऱ्याच्या कल्याणासाठी विचार करुन केलेले असते.स्व विचार हा तिथे नसतो.नेहमी स्वार्थ विचार करु नका. मतलब फक्त बघू नका.खरेपणाने आपला जीवन व्यवहार करा.हे करताना आपण निसर्गाच्या निस्वार्थी वृत्तीचा विचार करुया.उदा.म्हणून बहिणाबाई शेतात उभे असणार्या पिकाचे उदाहरण देतात.शेतामधील पीक हे ऊन,वारा पाऊस काही असो ते सारे कष्ट सहन करत दुसर्याच्या सुखासाठी , पोटासाठी आहोत हे स्विकारले आहे.आणि दुसऱ्याच्या कल्याणासाठी, सुखासाठी उपयोगी पडावे.कुणी भुकेले राहू नये यासाठी ते झटत असते.काळजी करीत असते.यावरुन मानवी जीवनात आपण निस्वार्थी बनून दुसर्याचा विचार करावा असे ज्ञान, तत्वज्ञान बहिणाबाई या ओळीत मांडतात. अत्यंत सुंदर असा हा गहन विचार बहिणाबाई आपल्या काव्यात मांडतात. मानवास नैतिक मूल्ये देत, संवेदनशील बनवत जाणे हे श्रेय या ओळीत आहे.
बहिणाबाई अक्षराची ओळख, वाचन लेखन, शाळा यापासून दूर .परंतु एक महान ज्ञान, मानवी जीवन सुखमय , समृद्ध करणारी एक पेरणी केली . बहिणाबाई चौधरी यांनी सांगितलेले तत्त्वज्ञान त्यांचा मुलगा सोपान, महान लेखक प्र.के.अत्रे या सर्वांच्या प्रयत्नातून आपणास उपलब्ध होऊ शकले. यांचा समावेश हा उच्च शिक्षणातील अभ्यासक्रमात समाविष्ट होत असून मानवी जीवनात ते एक पारायण आहे.

काळी आई या कवितेत शेतकरी, कष्टकरी जीवन रेखाटले आहे .

काळी आई
कवी-विठ्ठल वाघ

काया मातीत मातीत, तिफन चालते
ईज नाचते थयथय , ढग ढोल वाजवते.

नंदी बैलाच्या जोळीले, सदाशिव हकालते.
वटी बांधून पोटाले, पाराबतीउनारते

वटी पोटाले बांधते दोरी काठीने टांगते.
दोरी काठीने कांगणे, त्यात तान्हुलं वळते.

त्यात तान्हुलं वळते ,ढग बरसते.

येथे कवी विठ्ठल वाघ काळी आई कवितेत सांगतात की, शेतकर्याचे जीवन हे कष्टमय असते. टाळ्या मातीत ,शेतात नांगर चालते बीज पेरणीची तयारी करावी लागेल. पावसाने आपल्या आगमनाची तयारी सुरू केली आहे.वीजा कडाडत आहेत .आकाश ढगाळ होत आहे.आणि आता शेतकऱ्याला लवकरच आपली सर्व कामे पूर्ण करायची आहेत. शेतकरी स्त्रीया आपल्या लहान मुलांना सांभाळत आपली कामे वेगाने आणि वेळेत पूर्ण करु पाहत आहेत.पाठीशी बाळाला घेत , झाडाला झोळी टांगत आपले काम करत आहेत. असे हे वास्तव चित्रण कवीने आपल्या काव्यात केले आहे. आरामदायक जीवन शेतकर्यांच्या नशीबी नाही.ही एक सत्यता कवीने मांडली आहे.

धरत्रीच्या आंगोपांगी लाळानौसाचं गोंदनं
सरी वर येती माती न्हातीधुती होते .

तिचा कस्तुरीचा वास भूल जीवाले पाळते.
भूल जीवांचे पाळते , वारं सांजीले वाहते.

या ओळीत कवीने काळ्या आईची महती सांगितली आहे.शेतकर्याने पाऊस येण्याआधी जमीनीची मशागत करुन , नांगरणी केली आहे. अशा वेळी पावसाची रिपरिप, धो धो पाऊस सुरू होतो. सरी वर सरी जमीनीत मुरतात. माती, ढेकळे,यांचा एक सुंदर असा , कस्तुरीचा वास सर्वदूर पसरत जातो.त्या वासाने मानवी मन सुखावते.सायंकाळी एक थंड झुळूक ,वारा सायंकाळी वाहत असतो.अशा प्रकारे एक सुंदर असे निसर्गरम्य परिसर हा शेतीत तयार होतो. याचे चित्रण कवीने केले आहे.

काया ढेकलात डोया हिर्व सपन पाहेते
डोया सपन पाहेते काटा पायात रुतते.

काटा पायात रुतते, लाल रगत सांडते
हिर्व सपन फुलते.

काळ्या ढेकळात शेतकरी पावसाच्या आगमनाने आनंदी होऊन पिकाची पेरणी करते आणि शेतकरी पिक वर येण्याची वाट पाहतो. आता पेरणी होऊन पिक जमीनीवर डोकं काढत आपले आगमन मोठ्या दिमाखात करते.शेतकरी पिकाची काळजी घेत जमिनीत ंकष्टंत असतो. पिकाची निंदणी, खुरपणी सुरू असते.आणि ते करत असता शेतकर्याचे पायात काटे रुतून रक्त जमिनीत साडते . शेतकऱ्यांच्या कष्ठामुळे सुंदर असे हिरवे शेत तयार होते. हिर्व स्वप्न पूर्ण होते.

अशा प्रकारे शेतकरी राजा जे पिक मानवी जातीसाठी निर्माण करतो त्याचे जीवन कथित करण्याचा प्रयत्न कवीने आपल्या काव्यात केला आहे. शेतकरी जीवन हे कष्टमय असते. तो मानवाचा , पशु पक्षी , चा पोशिंदा आहे. आपणास या ठिकाणी ग्रामीण लेखक व्यंकटेश माडगूळकर यांची शेतकरी जीवनावरील कथा "लहान शेतकऱ्यांच्या जीवनातील एक दिवस " ही कथा बघुया.

लहान शेतकऱ्यांच्या जीवनातील एक दिवस
व्यंकटेश माडगूळकर

लहान शेतकऱ्यांच्या जीवनातील एक दिवस या कथेत प्रमुख पात्र म्हणजे शेतकरी नामा आणि त्याची पत्नी मंजा .एके दिवशी पहाटे मंजाला जाग आली. मजा झोपेतून उठली.तिने आपला पती नामा यास झोपेतून जागे केले. त्याने पाहिले की, दिवस केव्हाच उगवला .आपल्याला पहाटेपासूनच ऊसाला पाणी भरायचे होते.तो तंजावर रागावला की, मला लवकर उठवायचे होते. ती बोलली की, मला जाग आली होती परंतु कोंबडा आरवला नाही म्हणून मला वेळेचा अंदाज आला नाही.ती कोंबड्यावर रागावली तिने त्याना खुराड्यातून बाहेर काढले तो बाहेर येत नव्हता. येथे आपणास समजते की, शेतकरी पहाटेपासूनच कष्ट करणे आवश्यक आहे असे समजत असतो.

तो धावपळ करुन जातो.ऊसाला पाणी द्यायचे आहे हा विचार करत जातो. पाहतो तर बैल नव्हते. बैल कोणी चोरून नेले . आपल्या पत्नीला त्याने सांगितले की, बैल नाहीत.ती म्हणते की, तुम्ही त्यांना रात्री चारा , वैरण टाकले नसेल . नामा म्हणतो की,आता उन्हाळा आहे. एक एक काडी महत्त्वाची आहे.आणि हे आपले बैल जहागिरदार आहेत. असे नामा उपरोधाने बोलतो.

येथे आपणास समजते की, शेतकऱ्याची परिस्थिती ही अत्यंत गरीबीची असते उन्हाळ्यात पशुंना चारा पुरवणे अशक्य आहे.

नामा सगळीकडे बैल शोधत असतो. रस्यात एका रामोशी जो गावाची राखण करतो, त्याला भेटतो. त्यांचे नाव बळी आहे.तो म्हणतो की , माझे बैल पाहिले का ? तो म्हणतो की, नाही. त्यानंतर नामा म्हणतो की आम्ही तुम्हाला गावाची राखण करण्यासाठी ठेवले आहे. असे बोलत असता ,आबालाल चिच्या म्हणून एक माणूस बैल घेऊन येतो . त्याला पाहून नामाला आनंद होतो.नामा म्हणतो की, बरे झाले .माझे बैल मिळाले. परंतु आबालाल चिच्या राग करत असतो. आणि तो सांगतो की, मी शेतकऱ्यांचा मुलगा आहे.म्हणून मला या चपलेने मारा. दुसरे मी मका पिक घेतले. तिसरे म्हणजे हायब्रीड मका घेतला. तुमच्या बैलांची एक आरा मका खाल्ला आणि पूर्ण शेतात नासधूस केली.आता मी त्यांना सरकारी कोंडावाड्यात टाकतो.

हे ऐकून नामा बोलला की ती मुकी जनावरे आहेत.त्यांना काही मी सांगितले. त्यांचे बोलणे सुरू झाले. रामोशी बोलला की वाद करु नका . नामा पाटील नुकसान भरपाई
देतील. खरे म्हणजे बैलांनी खाल्लेच नव्हते.

नुकतेच ते बांधावर आले होते. तेव्हा पाटील नुकसान देणे हा म्हणतो. भरपाई मात्र देणार नाही. येथे आपणास समजते की, शेतकर्यांना आपल्या मालाची राखण ही जबाबदारी असते. प्राण्यांनी केलेली नासधूस ही शेतकर्यांसाठी धोकेदायक असते. कथेत परमेश्वर कृपेने पिकांची नासधूस झालेली नाही. पिक रक्षण ही एक महत्त्वपूर्ण भुमिका शेतकरी जीवनात आहे. येथे आपणास दोन व्यक्तींमधील भांडण समंजस पणे सोडवताना शेतकरी ,कष्टकरी दिसतात.

अखेरीस त्यांचे भांडण संपते. नंतर नामा पाटील आता बैलांना घेऊन शेताकडे निघतो. मुलगी न्याहारी घेऊन शेतात बसलेली असते .ती न्याहारी करण्यास सांगते .तो नकार देतो. बैलांना बांधतो. आणि पाणी काढण्यासाठी मोट वगैरे शोधतो. पाहतो तर ते सर्व हरवलेले. तो नाराज होतो. माझ्या ऊसाला पाणी भरायचे आहे. येथे आपणास समजते की, शेतकरी जीवन किती कष्टमय असते. पिकाला पाणी भरणे , पीक काढणी हे सर्व महत्त्वाचे असते. अनेक संकटांचा सामना करावा लागतो.

नामाचे मोटचे सामान आता सिताराम शेतकरी घेऊन गेला असेल याची कल्पना त्याला आली. तो सिताराम कडे जातो. तो जेवण करत असतो. नामा आपले सामान पाहतो आणि रागावतो. त्यावर तो म्हणतो की, मी कांदा , वांगे वगैरे भरतो. आणि लगेच घेऊन येणार होतो. तो सामान धूऊन सोडतो. नामा पाणी भरुन लागतो .पाणी आटायला येते तेवढ्यात त्या सामानातील कणा म्हणून मोटेचा एक भाग

हा पाण्यात पडतो. काम बंद होते . नामा ते आणण्यासाठी शेतातील कामकरी मुलास पाठवतो.तो लवकर येत नाही. स्वत: नामा तो कणा सुताराकडे नेतो.. सुतार नसतो. तो परेशान होतो. नंतर तो भाकरी खाऊ पाहतो .तो कावळ्यांनी ते खाण्यासाठी भाकर काढली. त्यामुळे ते सांडले गेले. नामा नाराज होतो. कावळ्यांना ढेकुळ मारु पाहतो.कुठेतरी राग काढू पाहतो. येथे आसपास समजते ,की शेतकरी कष्टकरी आपले शेतीचे सामान विकत घेऊ शकत नाही.पीक निघेपर्यंत अनेक संकटे ही आ करुन उभे राहतात.शनामा तसेच सिताराम हे दोन्ही सुखाने भाकरी देखील खाऊ शकत नाहीत. असे शेतकरी जीवन असते.

अखेरीस नामा थकून जातो . घरी येतो. मंजा त्याला कोंबडा मेल्याचे सांगते. आणि नंतर ऊसाला पाणी भरले का विचारते.आणि आपल्या पूर्ण दिवस भरातून खूप कष्ट करून देखील ऊसाला पाणी दिले गेले नाही याचे दु:ख तो सांगतो .शेतकरी पीक घेतो ते अनंत प्रयासाने. त्यामध्ये त्याला कुठलीही शाश्वती नसते. अशा प्रकारे शेती, शेतकरी, माणूस हा साहित्यात येतो.तयाचे जीवन हे उच्चशिक्षित मुलांना अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले आहे.ते समजते. आणि या घटकांबाबत एक संवेदनशील, सहनशील, भावनिक वृत्ती माणसाची , विद्यार्थ्यांची तयार होते. विद्यार्थी हाच देशाचा ,कुटुंबाचा त्याचा स्वत:चा विकास करू शकतो. आणि म्हणून भाषा, मराठी साहित्य, भूगोल विषय ,उच्च शिक्षण यांच्यामुळे मानवाचा शाश्वत विकास आहे,असेल.सर्व साहित्य हे उच्च शिक्षणात समाविष्ट करण्यात आले असून ते अखंड मानवजातीच्या कल्याणासाठी खुले केले आहे.